सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २६८ | शनिवार, दि. २० जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४६९००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३४७००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १११७००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २४००/-
भाव प्रती १० ग्राम

आजचे अभीष्टचिंतन





श्री. बाळू पाटील
माजी शहर युवक अध्यक्ष, अमळनेर



श्री. सचिन पाटील
अमळनेर



श्री. महेंद्र रामोसे
पत्रकार / शिक्षक



प्रा. ललित मोमाया
अमळनेर



प्रा. मनिष कारंजे
अमळनेर /पारोळा

## कष्टाच्या भांडवलावर घेतली भरारी; भेळ विक्रेत्याची लेक बनली 'सीए'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण अमळनेर येथील कु. प्रिया बाबुलाल तेली हिने घालून दिले आहे. अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाउंटंट - सीए) परीक्षेत यश मिळवत तिने कुटुंबासह अमळनेरचे नाव उज्ज्वल केले आहे.

प्रिया ही शहरातील 'लक्ष्मी भेळ सेंटर'चे संचालक बाबुलाल शिवराम तेली यांची कन्या आहे. हातगाडीवर भेळपुरी, कचोरी व अन्य खाद्यपदार्थ विकून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या बाबुलाल तेली यांनी मुलींना शिक्षणाची संधी देण्यासाठी आयुष्यभर कष्ट उपसले. आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही त्यांनी मुलींना शिक्षण, संस्कार आणि स्वप्ने पूर्ण करण्याचे बळ दिले.

प्रियाने आपले प्राथमिक शिक्षण डी.आर. कन्याशाळेत, तर पुढील शिक्षण प्रताप महाविद्यालयात पूर्ण केले. मोठ्या शहरातील महागड्या कोचिंग क्लासेसची मदत न घेता तिने अमळनेरमध्ये राहूनच सीएसारख्या प्रतिष्ठेच्या परीक्षेत यश संपादन केले.

तिने मे. अजय हिंदुजा अँड असोसिएट्स या संस्थेत तीन वर्षांची आर्टिकलशिप पूर्ण केली. सीए अजय हिंदुजा यांच्या मार्गदर्शनाखाली करप्रणाली, वित्त व्यवस्थापन आणि लेखापरीक्षण क्षेत्रातील सखोल ज्ञान तिने आत्मसात केले. या प्रशिक्षणाचा सीए परीक्षेतील यशामध्ये मोठा वाटा असल्याचे प्रिया सांगते.

तीन मुली, तिघींचेही उल्लेखनीय यश तेली कुटुंबातील तिन्ही मुली आज आपल्या क्षेत्रात यशस्वी ठरत आहेत. मोठी कन्या पूजा हिने एमबीए पूर्ण करून स्पेनमध्ये नोकरी स्वीकारली आहे. दुसरी कन्या प्रिया सीए बनली असून धाकटी कन्या निकिता हिने वाणिज्य शाखेत पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. ती सध्या अजय हिंदुजा अँड असोसिएट्स येथे कार्यरत आहे.




अमळनेर : लक्ष्मी भेळ सेंटरमध्ये सीए प्रिया तेली व तिचे वडील बाबूलाल तेली यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करताना सीए अजय हिंदुजा व ज्येष्ठ करसल्लागार राजेश शाह.

## सीआरपीएफ कर्मचाऱ्याचा प्रताप उघड
### पहिली पत्नी असताना दुसरीला २२ तोळे सोने, सहा लाखांचा चुना; प्रसूतीवेळी झाला भांडाफोड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : एपीआय सांगून पहिले लग्न झालेले असताना महिलेशी दुसरे लग्न करून एसआरपी कर्मचाऱ्याने २१ तोळे सोने , ५ लाख ९८ हजार रुपये आणि महिन्याला १० हजार रुपयात फसवणूक केल्याची घटना २०२२ पासून गजानन महाराज मंदिराजवळ मुंदडा नगर मध्ये घडली.

सुरेखा एकनाथ साळुंखे रा.मराठा मंडपाच्या मागे दोंडाईचा ता. शिंदखेडा या महिलेने फिर्याद दिली की १६ जून २०२२ रोजी मुंदडानगर येथील विनोद भटू सोनवणे याच्याशी झाला. तो नागपूरला ड्युटीवर असल्याने सुटीवर आला की ते दोघे मुंदडा नगर मध्ये एकत्र राहत होते. विनोद सोनवणे याने बुलेट घेण्यासाठी ९८ हजार रुपये तिच्याकडून मागून घेतले. २१ एप्रिल २०२३ रोजी त्याने सुरेखाला तिच्या नावावर शेती खरेदी करण्यासाठी २१ तोळे सोने मागून मोडून घेतले. तसेच ५ लाख रुपये देखील मागून घेतले मात्र शेती खरेदी केली नाही. त्याच्याकडे पैसे मागितले तेव्हा तो शारीरिक आणि मानसिक गांजपाठ करायचा आणि आणखी पैसे लागणार म्हणून महिन्याला १० हजार रुपये मागू लागला. ३ मे २०२६ रोजी सुरेखा मानस हॉस्पिटल जळगाव येथे ऑपरेशनला गेली तेव्हा त्याने तिचे नाव वैशाली असे लिहिले. याबाबत विचारणा केली तेव्ह विनोदने सांगितले की माझ्या पहिल्या पत्नीचे नाव वैशाली आहे आणि तिच्या नावावर मी कागदपत्रे केली आहेत खर्च कमी लागेल. सुरेखा त्यावेळी काही बोलली नाही मात्र घरी आल्यावर त्याला पहिल्या लग्नाबद्दल विचारपूस केली तेव्हा पहिल्या पत्नीपासून त्याला एक मुलगा




पान २ वर

जळगाव स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक

## अमळनेर केंद्रावर १०० टक्के मतदान
### राजकीय दिग्गजांच्या उपस्थितीने रंगली चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्हा स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद द्विवार्षिक निवडणूक २०२६ साठी गुरुवारी अमळनेर तहसील कार्यालयात मतदान प्रक्रिया शांततापूर्ण, उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. प्रशासनाच्या काटेकोर नियोजनामुळे मतदान केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. विशेष म्हणजे सर्व पात्र मतदारांनी मतदानाचा हक्क बजावत १०० टक्के मतदानाची नोंद केली.

अमळनेर तहसील कार्यालयातील मतदान केंद्रावर अमळनेर व चोपडा तालुक्यातील एकूण ७६ मतदारांनी मतदान केले. त्यामध्ये अमळनेर तालुक्यातील ४१ तर चोपडा तालुक्यातील ३५ मतदारांचा समावेश होता. सकाळी ८ वाजता मतदानास सुरुवात झाली आणि दुपारी २ वाजेपर्यंत सर्व मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदान प्रक्रिया नियोजित वेळेनुसार सायंकाळी ४ वाजेपर्यंत सुरू ठेवण्यात आली. मतदान केंद्रावर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन, महसूल विभाग आणि निवडणूक यंत्रणा पूर्णपणे सतर्क होती. उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे, उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते आणि पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षा व्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. मतदारांची ओळख पडताळणी, नोंदणी आणि मतदानाची संपूर्ण प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार सुरळीत पार पडली. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतपेट्या आणि निवडणूक साहित्य कडेकोट पोलीस बंदोबस्तात सुरक्षितपणे पुढील प्रक्रियेसाठी रवाना करण्यात आले. मतदानादरम्यान कोणताही वाद, तणाव किंवा गोंधळाची घटना घडली नसल्याने प्रशासनाने समाधान व्यक्त केले. मतदान केंद्राध्यक्ष म्हणून तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांनी जबाबदारी सांभाळली. त्यांना मतदान अधिकारी गणेश शिंदे, रवींद्र जोशी आणि रवींद्र चव्हाण यांनी सहकार्य केले. जळगाव जिल्हा स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या या निवडणुकीकडे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागून आहे. मतदान प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्याने आता सर्वांचे लक्ष २२ जून रोजी होणाऱ्या मतमोजणी आणि निकालाकडे लागले असून, या निकालातून जिल्ह्यातील राजकीय समीकरणांना कोणते नवे वळण मिळणार याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

### दिग्गजांच्या उपस्थितीने मतदान केंद्रावर राजकीय रंगत

मतदान केंद्रावर राज्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, आमदार अनिल पाटील, खासदार स्मिता वाघ आणि आमदार मंगेश चव्हाण यांनी भेट देत मतदान प्रक्रियेची पाहणी केली. यावेळी नेत्यांमधील दिलखुलास संवाद आणि हलक्या-फुलक्या चर्चांमुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. काही काळ मतदान केंद्र परिसरात राजकीय मैफिलच रंगली होती. महायुतीचे पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. दुसरीकडे महाविकास आघाडीचे गुलाबराव वाघ हेही आपल्या समर्थकांसह मतदान केंद्रावर उपस्थित होते. त्यामुळे केंद्र परिसरातील राजकीय वातावरण अधिकच रंगतदार झाले होते



अमळनेर : मतदानाप्रसंगी उपस्थित खासदार स्मिताताई वाघ, पालकमंत्री गुलाबराव पाटील, आमदार अनिलदादा पाटील, आ.मंगेश चव्हाण, नगरसेविका जयश्रीताई पाटील आदी.


## शेतकी संघाच्या अध्यक्षपदी संभाजी पाटील; उपाध्यक्षपदी गणेश भामरे बिनविरोध

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील तालुका शेतकी संघाच्या अध्यक्षपदी संभाजी लोटन पाटील (लोण) तर उपाध्यक्षपदी गणेश धर्मराज भामरे (बाम्हणे) यांची बिनविरोध निवड करण्यात आली.माजी मंत्री तथा आमदार अनिल दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाने संचालक मंडळाने दोघांची निवड केली. अमळनेर तालुका शेतकरी संघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित सहकार पॅनल चे १०,काँग्रेस प्रणित शेतकरी पॅनल चे ३, तर भाजप प्रणित किसान विकास पॅनल चे २ संचालक निवडून आले होते.आमदार पाटील यांनी शेतकी संघावर एकहाती वर्चस्व मिळविल्याने सत्तेची सर्व सूत्र त्यांच्या हातात होती.

अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीची प्रकिया १९ रोजी सकाळी ११ वाजता शेतकी संघाच्या कार्यालयात पार पडली.यावेळी सहकार पॅनलचे संचालक संजय पुनाजी पाटील,सचिन बाळू पाटील,विक्रांत

पान २ वर



अमळनेर : शेतकरी संघाच्या निवडीनंतर अध्यक्षपदी संभाजी पाटील, उपाध्यक्षपदी गणेश भामरे यांच्या समवेत आमदार अनिलदादा पाटील.

## अमळनेरात वीर शिरोमणी महाराणा प्रताप जन्मोत्सव उत्साहात साजरा
### रक्तदान शिबिर, विद्यार्थी गुणगौरव व व्याख्यानातून इतिहासाला उजाळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचा ४८६ वा जन्मोत्सव सालाबादप्रमाणे यावर्षीही १७ जूनला अमळनेर येथे उत्साहात साजरा करण्यात येणार आला.

राजपूत एकता मंच अमळनेर शहर व ग्रामीण यांच्यावतीने रक्तदान शिबीर, विद्यार्थी गुणगौरव आणि व्याख्यान अश्या जनहित साधणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.दि.१७ जून रोजी सकाळी १० वाजता महाराणा चौकातील स्मारक स्थळी महाराणा प्रताप यांच्या तैलचित्राचे पूजन व माल्यार्पण माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.यानंतर रक्तदान शिबिराचे उद्घाटन देखील त्यांच्या हस्ते पार पडले.असंख्य रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून भरभरून प्रतिसाद दिला.यावेळी १०० प्लस बॅग रक्त संकलित झाले.

**व्याख्यानातून मिळाला इतिहासाला उजाळा**

सायंकाळी ७ वा.छत्रपती शिवाजी महाराज नाट्य सभागृह, अमळनेर येथे व्याख्यान, विद्यार्थी गुणगौरव सोहळा आणि बक्षिस वितरण पार पडले.यावेळी उद्घाटक म्हणून आमदार अनिलदादा पाटील तर अध्यक्षस्थानी खासदार स्मिताताई वाघ,प्रमुख पाहुणे नगराध्यक्ष डॉ परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम,प्रा धर्मसिंह पाटील,माजी जि.प.सदस्य ऍड. व्ही.आर.पाटील,राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष भागवत पाटील,भाजप तालुकाध्यक्ष जिजाबराव पाटील,राष्ट्रवादी शरद पवार गट तालुकाध्यक्ष डी.एम.पाटील,नगरसेवक महेश देशमुख,जितेंद्र ठाकुर, व्याख्याते प्राचार्य संजय गिरासे,राजपूत एकता मंचचे अध्यक्ष रणजित पाटील,सूरज परदेशी उपस्थित होते.सुरवातीला स्पर्धा परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या समाजातील विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.त्यानंतर व्याख्यानातुन प्राचार्य संजय गिरासे यांनी महाराणा प्रताप: हल्दी घाटी युद्धाची साडे चारशे वर्षे व भारत या विषयावर इतिहासाला उजाळा दिला.महाराणा प्रताप यांचे शौर्य, स्वाभिमान आणि त्यागाचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

कार्यक्रमात शेतकी संघ व नगरपालिका निवडणुकीत विजयी झालेल्या मान्यवरांचाही सन्मान करण्यात आला व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांना बक्षिसे देण्यात आली.मिरवणूक अथवा डीजे टाळून रक्तदान,विद्यार्थी गुणगौरव व व्याख्यान असे सामाजिक उपक्रम राबविल्याने आमदार अनिलदादा पाटील व खासदार स्मितताई वाघ यांनी कौतुक करून जयंतीनिमित्त समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमास मोठ्या संख्येने समाजबांधव व महिला भगिनी उपस्थित होत्या.सूत्रसंचालन सौ. वसुंधरा लांडगे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व समाजबांधव व राजपूत एकता मंचच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.




अमळनेर : वीर शिरोमणी महाराणा प्रताप जयंतीनिमित्त शेतकी संघ व नगरपालिका निवडणूकीत विजयी झालेल्या मान्यवरांचा सन्मान करताना खासदार स्मितताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील, नगराध्यक्ष डॉ. परिक्षित बाविस्कर, प्राचार्य संजय गिरासे, रणजित पाटील, सूरज परदेशी आदी.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## संपादकीय

# तेलाची घसरण : भारताला सुवर्णसंधी

इराण-इस्रायल, अमेरिका संघर्ष शमल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली. भारतासारख्या तेल आयातदार देशासाठी ही अत्यंत दिलासादायक घडामोड आहे.इस्रायल-अमेरिका यांचे संयुक्तपणे इराणबरोबर सुरू असलेले युद्ध आता शांत होत असून त्याचा परिणाम तेलाच्या किमतीवर दिसत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर तेलाची किंमत ८० डॉलर्स प्रतिबॅरलच्या खाली आली असून ही अत्यंत आनंदाची आणि देशाच्या एकूण प्रगतीला प्रोत्साहन ठरणारी बाब ठरते. तेलाच्या या प्रचंड चढ-उताराचा भारतीय अर्थव्यवस्थेवर तितकाच मोठा परिणाम होतो, याचे कारण म्हणजे आपले तेल परावलंबन ८५ ते ९१ टक्के इतके मोठे आहे. साहजिकच, तेलाच्या किमती वाढल्या तर आपली सर्व आर्थिक गणिते राष्ट्रीय आणि वैयक्तिकस्तरावर बिघडतात. तेलाच्या किमती कमी झाल्यानंतर त्याचे निश्चित फायदे संपूर्ण अर्थव्यवस्थेला, विविध क्षेत्रांना आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वसामान्य जनतेला दिलासादायक ठरतात, याचा थोडासा तपशील अभ्यासणे उपयुक्त ठरते.सरकारला दरवाढीच्या काळात गॅस आणि डिझेल, पेट्रोल यावर मोठ्या प्रमाणात दरवाढ करता येत नसल्याने त्यासाठी अनुदान द्यावे लागते. परिणामी, सरकारचे उत्पन्न विकासकामांऐवजी आता दर नियंत्रणासाठी द्यावे लागत होते, ही परिस्थिती बदलल्याने तेवढ्या प्रमाणातील रक्कम विकासकामांसाठी वळवणे शक्य होते. भारताचा विकास दर अडचणीच्या परिस्थितीतदेखील टिकून होता. सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था हे वैशिष्ट्य आता पुन्हा एकदा तेल किमती कमी झाल्याने टिकवता येते; कारण तेलाच्या किमतीत १० डॉलर्सने वाढ झाली, तर आपले राष्ट्रीय उत्पन्न घसरत होते. तेल दरवाढीच्या कालखंडात राष्ट्रीय उत्पन्न ७ टक्क्यांऐवजी ते ६ टक्क्यांपर्यंत घसरेल, असे अंदाज होते. आता राष्ट्रीय विकासाचा दर ८ टक्क्यांच्या पुढे जाऊ शकेल. यातून रोजगार वाढवून बेरोजगारीच्या प्रश्नही काही प्रमाणात सुटेल.भारतीय रुपया शतक पार होण्याची भीती तेल दरातील वाढीने निर्माण झाली होती. तथापि, आता आयातीचा भार कमी होऊन रुपयादेखील बळकट होईल. . हळूहळू रुपया ९० च्या आत येऊ शकेल, याचसोबत आयात खर्च कमी झाल्याने देशांतर्गत उत्पादन कमी खर्चात होऊन कंपन्यांचा नफा वाढेल आणि विदेशी गंगाजळीदेखील वाढेल. देशाच्या आर्थिक आरोग्यात महत्त्वपूर्ण सुधारणा दिसेल. तेल किंमतवाढीचे चटके सर्वच क्षेत्रांत जाणवत असताना, तीव्र उन्हाळ्यात पावसाची सर यावी तसेच किंमत घसरणीचा अनुभव सर्व क्षेत्रांना मिळेल. वाहतूक उत्पादन क्षेत्र, वाहन उद्योग या सर्वांना तेल किंमतघटीचा अत्यंत सकारात्मक फायदा दिसतो. दीर्घकाळात भारतीय अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभी राहण्यास याची मदत होईल. तेलाच्या किमतीतील घसरण ही कायमस्वरूपी बाब नसून तात्पुरती मिळालेली एक महत्त्वाची संधी मानावी लागेल. परावलंबन कमी करण्यासाठी पर्यायी ऊर्जास्रोतांचा शोध आणि वापर महत्त्वाचा ठरतो, याबाबतही आपण मोठी झेप घेत आहोत.

सौरऊर्जेचा वापर करून घरगुती वीज वापर कमी करणे, हे सर्व प्रयोग भारत ऊर्जा स्वावलंबनाकडे नेण्याची महत्त्वाची पाऊलवाट ठरते. आपली स्पर्धात्मकता केवळ तेलाच्या किमतीने अडचणीत येते. तेल अत्यंत लहरी पद्धतीने आपले दर दाखवत असते. हा गेल्या दशकाचा अनुभव गाठीशी असल्याने तेल किमतीच्या घटीच्या महत्तम फायदा घेत असतानाच किमती पुन्हा वाढतील हा धोका लक्षात घेऊन नियोजन करणे शहाणपणाचे ठरते. तेलाच्या वाढत्या किमतीमुळे भारतीय उद्योजकांची उत्पादकता आणि स्पर्धात्मकता कमी झाली. आता तेल घसरल्याने भारतीय शेअर बाजारात गुंतवणूक वाढेल. विदेशी गुंतवणूकदार जे भारतातून भांडवल काढून घेत होते ते आता पुन्हा एकदा गुंतवण्यास सुरुवात करतील. शांतता करार ही बातमी येत असतानाच सेन्सेक्स दोन दिवसांत १,५०० अंकांनी वाढला. अर्थातच, भांडवल बाजार हा अनेक अर्थाने केवळ संवेदनशील नव्हे, तर भविष्यकालीन वाटचालीचे दर्शक असतो. त्यामुळे पुन्हा एकदा सेन्सेक्स हा लक्षपूर्तीकडे म्हणजेच एक लाख हा टप्पा वर्षाखेरीस पार करू शकेल, असा अंदाज तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. तेल किमती कमी झाल्याने होणारा फायदा हा सक्रियपणे पुढे हस्तांतरित करण्याची महत्त्वाची जबाबदारी सरकारची ठरते; अन्यथा तेलाच्या किमती फक्त वाढवणे व आंतरराष्ट्रीय तेल किमती घसरल्यानंतर त्या कमी न करणे हा पूर्वपाठ न ठेवता सर्व अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी हे एक महत्त्वाचे भांडवल म्हणून वापरणे आवश्यक ठरते. विदेशी गुंतवणूक सरकारच्या विविध धोरणांचा अत्यंत चिकित्सक विचार करत असल्याने अर्थव्यवस्थेची सक्षमता वाढवण्यासाठी धाडसपूर्ण दर कपात सर्व जनतेपर्यंत पोहोचवणे व सर्व क्षेत्रांपर्यंत त्याचे फायदे मिळवून दिले तरच

सकारात्मक परिणाम दिसून येतील. सौरऊर्जेचा वापर करून घरगुती वीज वापर कमी करणे, हे सर्व प्रयोग भारत ऊर्जा स्वावलंबनाकडे नेण्याची महत्त्वाची पाऊलवाट ठरते. आपली स्पर्धात्मकता केवळ तेलाच्या किमतीने अडचणीत येते. तेल अत्यंत लहरी पद्धतीने आपले दर दाखवत असते. हा गेल्या दशकाचा अनुभव गाठीशी असल्याने तेल किमतीच्या घटीच्या महत्तम फायदा घेत असतानाच किमती पुन्हा वाढतील हा धोका लक्षात घेऊन नियोजन करणे शहाणपणाचे ठरते. तेलाच्या वाढत्या किमतीमुळे भारतीय उद्योजकांची उत्पादकता आणि स्पर्धात्मकता कमी झाली. आता तेल घसरल्याने भारतीय शेअर बाजारात गुंतवणूक वाढेल. विदेशी गुंतवणूकदार जे भारतातून भांडवल काढून घेत होते ते आता पुन्हा एकदा गुंतवण्यास सुरुवात करतील. शांतता करार ही बातमी येत असतानाच सेन्सेक्स दोन दिवसांत १,५०० अंकांनी वाढला. अर्थातच, भांडवल बाजार हा अनेक अर्थाने केवळ संवेदनशील नव्हे, तर भविष्यकालीन वाटचालीचे दर्शक असतो. त्यामुळे पुन्हा एकदा सेन्सेक्स हा लक्षपूर्तीकडे म्हणजेच एक लाख हा टप्पा वर्षाखेरीस पार करू शकेल, असा अंदाज तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. तेल किमती कमी झाल्याने होणारा फायदा हा सक्रियपणे पुढे हस्तांतरित करण्याची महत्त्वाची जबाबदारी सरकारची ठरते; अन्यथा तेलाच्या किमती फक्त वाढवणे व आंतरराष्ट्रीय तेल किमती घसरल्यानंतर त्या कमी न करणे हा पूर्वपाठ न ठेवता सर्व अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी हे एक महत्त्वाचे भांडवल म्हणून वापरणे आवश्यक ठरते. विदेशी गुंतवणूक सरकारच्या विविध धोरणांचा अत्यंत चिकित्सक विचार करत असल्याने अर्थव्यवस्थेची सक्षमता वाढवण्यासाठी धाडसपूर्ण दर कपात सर्व जनतेपर्यंत पोहोचवणे व सर्व क्षेत्रांपर्यंत त्याचे फायदे मिळवून दिले तरच सकारात्मक परिणाम दिसून येतील.

## सीआरपीएफ कर्मचाऱ्याचा प्रताप उघड

**पान १ वरून :** व एक मुलगी आहे असे सांगितले. सुरेखाने त्याला २१ तोळे सोने,५ लाख रुपये आणि बुलेटचे ९८ हजार परत मागितले.तेव्हा तो उडवाउडवीची उत्तरे देत होता. सुरेखाला तिच्या फसवणुकीची जाणीव झाल्याने तिने अमळनेर पोलीस स्टेशनला विनोद विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ८५,३१६(२) , ८२(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून तपास सहाययक पोलीस निरीक्षक शरद काकळीज करीत आहेत. दरम्यान पोलिसांनी विनोद भटू सोनवणे याची अधिक माहिती काढण्याचा प्रयत्न केला असता तो एपीआय नव्हे तर एसआरपीमध्ये नोकरीला असून काश्मीरला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

# कोणता देश कसे वाचवतोय पाणी ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ग्लोबल वॉर्मिंग, ऋतूचक्रातील बदल आणि वाढती लोकसंख्या यामुळे जगभरात पिण्याच्या पाण्याची टंचाई गंभीर बनत चालली आहे. नीती आयोगाच्या एका अहवालानुसार, जगातील अनेक प्रमुख शहरे 'डे झीरो' (पाणी संपण्याचा दिवस) कडे वाटचाल करत आहेत; मात्र या भीषण संकटाच्या काळातही जगातील काही देशांनी आपल्या अनोख्या तंत्रज्ञानाच्या, कडक कायद्यांच्या आणि लोकसहभागाच्या जोरावर पाण्याचे यशस्वी नियोजन केले आहे. हे देश नेमकी कशी पाणी बचत करतात, हे पाहणे मानवी जीवनासाठी महत्त्वाचे आहे.

**ऑस्ट्रेलिया : स्मार्ट मीटरिंग, डिजिटल देखरेख**

निसर्गाच्या लहरीपणामुळे ऑस्ट्रेलियाला नेहमीच मोठ्या दुष्काळाचा सामना करावा लागतो. यावर मात करण्यासाठी त्यांनी तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. ऑस्ट्रेलियात प्रत्येक घरात 'स्मार्ट मीटर्स' बसवले आहेत. याद्वारे नागरिक आपल्या मोबाईल ॲपवर पाण्याचा रिअल-टाईम वापर पाहू शकतात. घरात कुठेही पाईपलाईन लीक असल्यास हे मीटर त्वरित अलर्ट पाठवते. दुष्काळसदृश परिस्थितीत तिथे गाड्या धुणे, बागेला पाणी देणे किंवा स्वीमिंग पूल भरणे यावर कडक निर्बंध लादले जातात. नियम मोडल्यास हजारो डॉलर्सचा दंड केला जातो.

**सिंगापूर : पाण्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान**

सिंगापूरकडे स्वतःचे पाण्याचे नैसर्गिक स्रोत (नद्या किंवा भूजल) अत्यंत मर्यादित आहेत. एकेकाळी पाण्यासाठी पूर्णपणे मलेशियावर अवलंबून असलेल्या सिंगापूरने आज 'जल आत्मनिर्भरता' मिळवली आहे. सिंगापूरने सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचे जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान विकसित केले आहे. मैलापाण्यावर सूक्ष्म-फिल्ट्रेशन, रिव्हर्स ऑस्मोसिस (आरओ) आणि अल्ट्राव्हायोलेट (यूव्ही) किरणांद्वारे प्रक्रिया करून ते इतके शुद्ध केले जाते की ते थेट पिण्यायोग्य बनते. याला 'न्यू वॉटर' म्हटले जाते. सिंगापूरने समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे शुद्धीकरण करणारे ४ मोठे प्लांट उभारले आहेत. सिंगापूरच्या एकूण जमिनीच्या दोन तृतीयांश भागावर पावसाचे पाणी गोळा करण्यासाठी विशेष 'कॅचमेंट' आणि विस्तीर्ण जलाशय तयार करण्यात आले आहेत.



### भारतासाठी काय धडा ?

१. भारतामध्ये मान्सूनमुळे मुबलक पाऊस पडतो; मात्र योग्य नियोजनाअभावी बहुतांश पाणी समुद्राला जाऊन मिळते. भारताला जर पाण्याचे संकट टाळायचे असेल, तर इस्रायलप्रमाणे शेतीत ठिबक सिंचन सक्तीचे करावे लागेल. सिंगापूरप्रमाणे शहरांमधील सांडपाण्याचा पुनर्वापर वाढवावा लागेल. प्रत्येक नवीन इमारतीमध्ये 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' केवळ कागदावर न ठेवता प्रत्यक्ष राबवावे लागेल.

२. पाण्याचा नवा स्रोत निर्माण करणे कठीण आहे, पण आहे त्या पाण्याचा पुनर्वापर करणे सहज शक्य आहे. 'रिड्यूस (कमी वापर), रियूज (पुनर्वापर) आणि रिसायकल (प्रक्रिया)' हे त्रिसूत्री सूत्र स्वीकारल्याशिवाय जगाला भविष्यात पर्याय नाही.

**जर्मनी : निसर्गपूरक तंत्र आणि 'स्पंज सिटी' संकल्पना**

युरोपमधील प्रगत देश असलेल्या जर्मनीने पाण्याचे नियोजन करण्यासाठी कायद्याची आणि निसर्गाची मदत घेतली आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंग बंधनकारक जर्मनीमध्ये घराच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी गोळा करणे कायद्याने बंधनकारक आहे. हे पाणी फिल्टर करून ते फ्लशिंग, कपडे धुणे आणि बागेसाठी वापरले जाते. जर्मनीतील इमारतींच्या छतावर वनस्पती लावल्या जातात. या वनस्पती पावसाचे पाणी शोषून घेतात आणि ते थेट वाहून जाण्याऐवजी हळूहळू हवेत बाष्पीभवन होते किंवा जमिनीखाली झिरपते. शहरांमध्ये रस्त्यांच्या खाली अवाढव्य टाक्या बांधल्या आहेत, ज्यामुळे पावसाचे पाणी वाया न जाता साठवले जाते आणि पुराचा धोकाही टळतो.

**जपान : तंत्रज्ञान आणि संस्कृतीचा मेळ**

जपानमध्ये पाण्याचा अपव्यय टाळणे ही त्यांची संस्कृती मानली जाते. जपानमध्ये टॉयलेटच्या फ्लश टँकच्या वरच हात धुण्यासाठी बेसिन दिलेले असते. हात धुऊन झालेले तेच पाणी खाली टँकमध्ये साठवले जाते आणि पुढील वेळी फ्लशसाठी वापरले जाते. जपानमधील कारखान्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या पाण्यावर तिथेच प्रक्रिया करून ते अंतर्गत कामांसाठी पुन्हा-पुन्हा वापरले जाते.

**इस्रायल : वाळवंटात फुलवलेले नंदनवन (९० टक्के सांडपाण्याचा पुनर्वापर)**

भौगोलिकदृष्ट्या इस्रायल हा अत्यंत कोरडा आणि निम्म्याहून अधिक वाळवंट असलेला देश आहे; पण आज हा देश जलव्यवस्थापनात जगात पहिल्या क्रमांकावर आहे. ठिबक सिंचनाचा जनक (ड्रीप इरिगेशन) म्हणून जगात ओळख निर्माण केलेल्या इस्रायलने पारंपरिक शेती पद्धतीला फाटा देत पिकांच्या मुळाशी थेंबाथेंबाने पाणी देण्याचे तंत्रज्ञान विकसित केले. यामुळे शेतीमध्ये ५० टक्क्यांहून अधिक पाण्याची बचत होते. सांडपाण्याचा विक्रमी पुनर्वापर इस्रायलने केला आहे. त्यांच्या देशातील तब्बल ९० टक्के सांडपाण्यावर अत्याधुनिक प्रक्रिया केली जाते. हे प्रक्रिया केलेले पाणी शेतीसाठी वापरले जाते. इस्रायल त्यांच्या पिण्याच्या पाण्याची ७० टक्क्यांपेक्षा जास्त गरज समुद्राचे खारे पाणी गोड करून पूर्ण करतो.

# अल्पवयीन मुलीशी थाटला संसार; प्रसूतीनंतर झाला बलात्काराचा गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अल्पवयीन असताना प्रियकरासोबत पळून गेली आणि प्रसूतीच्या वेळी वय उघड झाल्याने पतीविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची नामुष्की चोपडाई कोंढावळ येथील अल्पवयीन गृहिणीवर आल्याची घटना १७ रोजी आली.

चोपडाई कोंढावळ येथील एक अल्पवयीन महिला प्रसूतीसाठी धुळे जिल्हा सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. १२ रोजी त्या महिलेला मुलगा झाला. नोंदणीसाठी जन्मतारीख विचारली असता महिलेचे वय १७ वर्षे पाच महिने आढळून आले. डॉक्टरांनी पोलिसांना कळवल्यावर तिचा जबाब घेण्यात आला. तिने जबाबात सांगितले की ईनेश राजू पावरा याच्याशी माझे प्रेमसंबंध होते. त्याने मला २०२५ मध्ये पळवून आणत लग्न न लावताच त्याच्या परिवारासोबत ठेवून शारीरिक संबंध ठेवत होता. ही बाब तिच्या सासू सासरे आणि आई वडील याना कोणालाच माहीत नव्हते. ती गर्भवती राहिली आणि दिवस भरल्यावर तिच्या सासूने तिला धुळे जिल्हा सरकारी रुग्णालयात दाखल केले आहे. प्रसूतीच्या वेळी ही बाब लक्षात आल्याने जबाबवरून अमळनेर पोलीस स्टेशनला बालकांच्या लैंगिक अपराधापासून संरक्षण कायदा २०१२ च्या कलम ६ सह भारतीय न्यायसंहिता कलम ६४(एम)(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज करीत आहेत.



# घराचा ताबा घेऊन सामान फेकले; दोघांवर गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : घराला कुलूप लावून घराचा ताबा घेतला आणि घरातील साहित्य फेकून दिल्याची घटना १४ रोजी सकाळी ८ वाजता घडली.राजुसिंग बाबूसिंग परदेशी यांनी फिर्याद दिली, की न्यू प्लॉटमधील शनी मंदिर गल्लीतील नंबर ४०/१ हे त्यांनी २०१८ मध्ये खरेदी करून स्वतःच्या नावावर केले आहे.

हे घर त्यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या मुलांना मोफत दिले होते. मुले दररोज अभ्यास करायची. १० जून रोजी परदेशी यांचा मुलगा शुभम आणि त्याच्या अभ्यास करणाऱ्या मुलांनी घराला कुलूप लावून निघून गेले होते. १४ रोजी ते परत आले तेव्हा त्यांच्या घराला दुसरे कुलूप लावलेले आढळून आले. त्यावेळी तेथे नरेंद्र जयकृष्ण रामदासी व त्यांची आई असे दोघे उभे होते. त्यावेळी त्यांनी सांगितले की कुलूप आम्ही लावले चार पाच वर्षांपासून आम्ही सहन करत आहोत. घर आमचे आहे. पुन्हा मुले अभ्यासाला पाठवले तर खोट्या केसेस करू अशी धमकी देऊन शिवीगाळ केली. घरातील काही सामान फेकून दिले आणि इतर सामान तसेच ठेवले. राजुसिंग यांच्या फिर्यादीवरून अमळनेर पोलीस स्टेशनला दोघांविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम ३३०(१) , ३२९(४) ,३२४(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास हेडकॉन्स्टेबल चंद्रकांत पाटील करीत आहेत.

# शेतकी संघाच्या अध्यक्षपदी संभाजी पाटील


**पान १ वरून :** पाटील, नितीन पाटील,रणजीत पाटील,शंकर बैसाने,सुषमा देसले, मालुबाई पाटील, शेतकरी पॅनल चे सुरेश पाटील, प्रा. शाम पवार तर किसान विकास पॅनलचे जितेंद्र पाटील व प्रफुल पवार उपस्थित होते.निर्धारित वेळेत सत्ताधारी गटातील फक्त दोघांचे फॉर्म प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.निवडणूक अधिकारी म्हणून धर्मराज पाटील तर सहाय्यक अधिकारी सुनील महाजन यांनी कामकाज पाहिले.

आमदार अनिलदादा पाटील यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित अध्यक्ष संभाजी पाटील व उपाध्यक्ष गणेश भामरे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी आमदार पाटील यांनी सांगितले की,तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी महत्वाची असलेली संस्था जनतेने आपल्याला विश्वासाने सोपविली आहे त्यामुळे आपली जबाबदारी वाढली आहे.येणाऱ्या काळात संघाची बळकटी करून संघाचे उत्पन्न कसे वाढेल यावर भर द्यावा लागणार आहे,सोबतच शेतकऱ्यांच्या हिताला सर्वाधिक प्राध्यान्य द्यावे लागणार आहे.वेळप्रसंगी कर्ज घ्याव लागलं तरी चालेल पण उत्पन्नाचे स्त्रोत वाढवावे लागणार आहेत.विरोधकांनी कितीही खोट्या वल्गना केल्या तरी शेतकऱ्यांनी आपल्यावर टाकलेल्या विश्वासाला आपल्याला जपायचे असल्याचे त्यांनी सांगितले. पद मिळावे ही प्रत्येकाची अपेक्षा असते मात्र ज्यांनी त्याग केला आहे त्यांना देखील येणाऱ्या काळात संधी दिली जाणार असल्याचे सूतोवाच त्यांनी केले,सोबतच पक्षाच्या ज्या कार्यकर्त्यांनी पॅनल निवडून आणण्यासाठी मेहनत घेतली आहे त्यांना तज्ञ संचालक पदी संधी देण्यात यावी असे त्यांनी संचालक मंडळाला आवर्जून सांगितले.यावेळी तालुकाध्यक्ष भागवत पाटील यांनी प्रस्ताविक केले तर नवनिर्वाचित उपाध्यक्ष गणेश भामरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला माजी जि.प.सदस्या जयश्रीताई पाटील,बाजार समितीचे सभापती अशोक पाटील,तिलोत्तमाताई पाटील,शहराध्यक्ष चेतन राजपूत तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष संभाजी पाटील हे जरी सहकार पॅनल मधून निवडून आले असले तरी ते काँग्रेस पक्षात होते मात्र अध्यक्ष निवडणुकीच्या आधीच संभाजी पाटील यांनी आमदार पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला,त्यामुळे पक्षाची देखील ताकद वाढली आहे.

# महापुरुषांचा अवमान करणाऱ्या रिलायन्स जिओ स्मार्ट बाजारवर गुन्हा दाखल करा : राजमुद्रा फाउंडेशन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील ढेकू परिसरातील राजर्षी शाहू महाराज सर्कल येथे उभारण्यात आलेल्या राजर्षी शाहू महाराज यांच्या फलकावर अनधिकृतपणे जाहिरात फलक लावून महापुरुषांचा अवमान केल्याचा आरोप करत रिलायन्स जिओ स्मार्ट बाजार, अमळनेर शाखेवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.



*अमळनेर : पोलीस निरिक्षक दत्तात्रय निकम यांना निवेदन देतांना राजमुद्रा फाउंडेशनचे अध्यक्ष शाम पाटील, योगेश महाजन, सुरज परदेशी, हर्षल महाजन, संजय पाटील, अनिरुद्ध शिसोदे व शुभम् पवार आदी.*

याबाबत राजमुद्रा फाउंडेशनचे अध्यक्ष शाम जयवंतराव पाटील यांनी संबंधित प्रशासनाकडे निवेदन सादर केले. निवेदनात म्हटले आहे की, बहुजन समाजाला न्याय व हक्क मिळवून देणारे तसेच आरक्षणाचे जनक म्हणून ओळखले जाणारे राजर्षी शाहू महाराज यांचा फलक राजमुद्रा फाउंडेशनच्या वतीने गेल्या दहा वर्षांपासून राजर्षी शाहू महाराज सर्कल येथे लावण्यात आलेला आहे. मात्र, गेल्या पंधरा दिवसांपासून या फलकावर रिलायन्स जिओ स्मार्ट बाजार, अमळनेर या व्यावसायिक संस्थेने अनधिकृतपणे जाहिरात फलक लावल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे राजर्षी शाहू महाराज यांचा अवमान झाला असून बहुजन समाजाच्या भावना दुखावल्या गेल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

निवेदन देताना अमळनेर तालुका मराठा समाजाचे संचालक संजय पाटील, भारतीय जनता पक्षाचे अमळनेर शहराध्यक्ष योगेश महाजन, शिवसेना कार्यकर्ते सुरज परदेशी, हर्षल महाजन, अनिरुद्ध शिसोदे तसेच शुभम पवार उपस्थित होते. दरम्यान, या प्रकरणाची प्रशासनाकडून दखल घेऊन पुढील कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समिती
## दैनिक बाजारभाव

| प्रकार | भाव | |
|---|---|---|
| | कमी | जास्त |
| गहू | २३४६ | २३९५ |
| बाजरी | २२५० | २३५० |
| दादर | २८५१ | ३९३० |
| हा.ज्वारी | २१०० | २३०० |
| मका लाल | २०६५ | २२१४ |
| मुंग | -- | ७५०२ |
| उडीद | -- | --- |
| हरभरा काबुली व्ही.टू. | ५६०० | ५९०० |
| हरभरा गावराणी | -- | -- |
| हरभरा गुलाबी | -- | ५२५१ |
| हरभरा चापा | ५४०० | ५६०० |
| हरभरा डॉलर सफेद | ७००० | ७२०० |
| हरभरा गुल्लर | -- | -- |
| चवळी | -- | ५१५१ |
| तूर | ६९०० | ७१६१ |
| शेंगा | -- | -- |
| तीळ | -- | ७००० |
| सोयाबीन | -- | -- |
| सूर्यफुल | -- | -- |
| धणे | -- | १५००० |
| जिरे | -- | -- |
| पांढरी तूर | -- | -- |

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# सातव्या वर्षी शिकली संगणक प्रोग्राम, १६ व्या वर्षी शंभर कोटींचा एआय स्टार्टअप

## जगावेगळी किमयागार प्रांजली अवस्थी आता काय करते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खेळण्या-बागडण्याच्या वयात भारतीय वंशाच्या प्रांजली अवस्थीने शंभर कोटी रुपयांच्या एआय कंपनीचा पाया घातला. २०२२ मध्ये प्रांजलीने एआय कंपनी सुरू केली आणि अवघ्या एका वर्षातच इतके यश मिळविले की कंपनीचे मूल्य शंभर कोटी रुपयांपर्यंत पोहोचले.

प्रांजली अवस्थी या भारतीय मूळची अमेरिकन कोडरने ज्या वयात बहुतेक मुले व्हिडिओ गेम्स खेळायला शिकतात, अशा वयात कोडिंगचे बारकावे शिकले. वयाच्या सातव्या वर्षी प्रोग्रामिंगच्या विश्वात एन्ट्री करून वयाच्या १३ व्या वर्षी संशोधन प्रयोगशाळेत इंटर्नशिप मिळवून आणि अवघ्या १६ व्या वर्षी स्वतःचा एआय स्टार्टअप सुरू करून प्रांजलीने जगभर ओळख मिळविली.

आता १९ वर्षीय भारतीय मूळची अमेरिकेत स्थायिक झालेल्या प्रांजलीने आपल्या कामगिरीसह अख्ख्या आयटी क्षेत्राला चकित केले आहे. ज्या वयात बहुतेक मुले दहावी परीक्षेची तयारी करत असतात त्या वयात प्रांजलीने शंभर कोटींची कंपनी सुरू केली. प्रांजली अवस्थी या १९ वर्षीय भारतीय मुलीने वयाच्या अवघ्या १६ वर्षी Delv.AI या एआय स्टार्टअपद्वारे तंत्रज्ञान क्षेत्रात खळबळ उडवून दिली. ज्या कृत्रिम बुद्धिमत्तेची जगाने धास्ती घेतली आहे, त्याच तंत्रज्ञानाकडे प्रांजलीने संधी म्हणून पाहिले.

### वयाच्या सातव्या वर्षीच कोडिंग शिकले

तंत्रज्ञानाबद्दल प्रचंड उत्सुकता घेऊन जन्मलेल्या प्रांजलीचा कोडिंगच्या विश्वातील प्रवास खूप कमी वयातच सुरू झाला. वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी तिने वडिलांच्या कॉम्प्युटरवर कोडिंग शिकायला सुरूवात केली. या वयात बहुतेक मुले अजूनही मूलभूत अंकगणिताशीच झगडत असतात, पण, प्रांजलीने अशक्यही शक्य करून दाखविले. प्रांजली (११ व्या वर्षी) आणि तिचे कुटुंब अमेरिकेत स्थायिक झाले, जिथे प्रगत कॉम्प्युटर आणि संशोधनाच्या विश्वात तिच्यासाठी नवीन संधींची दारे उघडली गेली.

सक्सेस स्टोरी



### प्रांजलीची एआय कंपनी करते काय?

जगभर आणि सतत वाढणाऱ्या इंटरनेट संसाधनांच्या सहाय्याने शिक्षक आणि लोकांना कोणतीही विशिष्ट माहिती त्वरीत शोधण्यास प्रांजलीने सुरू केलेल्या Delv.AI चे मुख्य लक्ष्य आहे. प्रांजलीच्या Delv.AI कंपनीला या बिझनेस मॉडेलसाठी चार लाख ५० हजार म्हणजे अंदाजे ३.७ कोटी रुपयांचा निधी मिळाला असून, सध्या कंपनीचे निव्वळ मूल्य अंदाजे शंभर कोटी रुपये आहे.

### वर्षभरातच कंपनीचे मूल्य शंभर कोटींपर्यंत वाढले

जानेवारी २०२२ मध्ये प्रांजलीच्या आयुष्याने नवीन कलाटणी घेतली आणि वयाच्या १६ व्या वर्षी Delv.AI नावाचे एआय-आधारित रिसर्च प्लॅटफॉर्म सुरू केले. Delv.AI प्लॅटफॉर्म व्यासपीठ शैक्षणिक शोधनिबंध, पीडीएफ आणि मोठ्या डेटासेटच्या अफाट संग्रहातून माहिती कार्यक्षमतेने शोधणे, व्यवस्थित करणे, त्यामधूनही आवश्यक माहिती मिळविणे आणि त्याचा सारांश तयार करणे यासाठी शिक्षणतज्ज्ञ, व्यावसायिक आणि संशोधकांना मदत करण्याच्या उद्देशाने विकसित केले गेले आहे.

### बघता-बघता आयटी क्षेत्रात खळबळ उडविली

लाँचनंतर बघताच बघता Delv.AI ने तंत्रज्ञान बाजारात खळबळ उडवून दिली आणि बॅकएंड कॅपिटल व व्हिलेज ग्लोबल यासारख्या गुंतवणूकदारांनी प्रांजलीच्या नावीन्यपूर्ण आयडियावर विश्वास दाखविला. यासोबतच या नवख्या स्टार्टअपने बाजारात येताच अंदाजे चार लाख ५० हजार किंवा ३.८९ कोटी रुपयांचा निधी उभारला. ऑक्टोबर २०२३ पर्यंत कंपनीचे मूल्यांकन शंभर कोटींवर पोहोचले. प्रांजलीने सुरू केलेली नवीन टेक्नॉलॉजी कवटाळवाणे रिसर्च आणि आर ॲण्ड डीची कामाने ७५ टक्क्यांपर्यंत कामे पूर्ण करते. ज्यामुळे लोकांची अनेक तासांची मेहनत वाचते म्हणून रिसर्च व्यावसायिकांमध्ये तंत्रज्ञान लोकप्रिय झाले.

### प्रांजली अवस्थी आता काय करते?

सॅन फ्रान्सिस्कोमध्ये स्थित आता १९ वर्षीय प्रांजली कोडिंग कौशल्याने नवनवीन शोध आणि रिसर्च करत आहे. प्रांजली आता स्लॅशी (वायसीएस २५) या एआय-शक्तीवर चालणाऱ्या ई-मेल असिस्टंट आणि ऑटोमेशन प्लॅटफॉर्मची सीईओ आणि सह-संस्थापक आहे.

# धुबरी-फुलबारी ब्रिज : भारत का सबसे लंबा नदी पुल रच रहा इतिहास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ब्रह्मपुत्र नदी पर बन रहा धुबरी-फुलबारी ब्रिज पूरे देश का ध्यान अपनी ओर आकर्षित कर रहा है। १९.३ किलोमीटर लंबा यह पुल असम के धुबरी और मेघालय के फुलबारी को जोड़ देगा, जिससे २०५ किमी की सड़क यात्रा घटकर सिर्फ १९ कि.मी. रह जाएगी। यह ब्रिज पूर्वोत्तर भारत की लाइफलाइन बनने जा रहा है।

छह लेन वाले इस पुल से ट्रेन, कार, ट्रक आदि सभी वाहनों की निर्बाध आवाजाही संभव होगी। निर्माण कार्य करीब ५९% पूरा हो चुका है और इसे २०२८ तक खोलने का लक्ष्य है। ब्रिज के शुरू होने से भूटान, बांग्लादेश से भी कारोबार और पर्यटन को जबरदस्त बढ़ावा मिलेगा। स्थानीय लोगों के लिए यह पुल तरक्की, रोजगार और नई पहचान का जरिया बनेगा। इसे जापान इंटरनेशनल कोऑपरेशन एजेंसी की मदद से बनाया जा रहा है, जिससे पूर्वोत्तर भारत बुनियादी ढांचे के क्षेत्र में नया कीर्तिमान स्थापित करेगा. धुबरी-फुलबारी ब्रिज ब्रह्मपुत्र नदी पर बन रहा एक ऐतिहासिक और भारत का सबसे लंबा नदी पुल है, जो असम के धुबरी को मेघालय के फुलबारी से जोड़ेगा।



### ब्रिज की मुख्य जानकारी

- इस ब्रिज की कुल लंबाई लगभग १९.३ किलोमीटर होगी, जो भारत में किसी नदी पर बनने वाला सबसे लंबा पुल है।
- ब्रिज के पूरा होने से असम व मेघालय के बीच की सड़क दूरी २०५ किलोमीटर से घटकर मात्र १९ किलोमीटर रह जाएगी, जिससे यात्रा का समय ७ घंटे से घटकर २०-४० मिनट हो जाएगा।
- अभी तक दोनों शहरों के बीच आवागमन नाव या फेरी के द्वारा होता है, जिसमें २.५ से ४ घंटे लगते हैं।

### निर्माण की प्रगति व संरचना

- ब्रिज का निर्माण कार्य २०२१ में शुरू हुआ और इसे २०२८ तक पूर्ण करने का लक्ष्य है।
- २०२५ तक इस परियोजना का लगभग ५९% कार्य पूरा हो चुका हैं।
- ब्रिज ४-६ लेन का बनाया जा रहा है, जिसमें भारी वाहनों और यात्री वाहनों के लिए पर्याप्त जगह होगी।
- यह एक एक्स्ट्राडोस्ड केबल स्टे ब्रीज है, जिसमें करीब १९९ पिलर होंगे और इसका डिजाइन नेविगेशन के अनुसार तैयार किया गया है, ताकि नदी में जहाजों का आवागमन बाधित न हो।
- परियोजना जापान इंटरनेशनल कोऑपरेशन एजेंसी द्वारा वित्तपोषित है।

### महत्व और लाभ

- भारत के पूर्वोत्तर राज्यों की कनेक्टिविटी देश के बाकी हिस्सों से काफी मजबूत होगी।
- पश्चिम बंगाल, असम, मेघालय, भूटान और बांग्लादेश भी इस ब्रिज के बनने से जुड़ेंगे, जिससे व्यापार और पर्यटन को बढ़ावा मिलेगा।
- स्थानीय लोगों को तेज, सुरक्षित और सुगम यात्रा सुविधा उपलब्ध होगी.

# बँकेच्या चेकवर 'लाख' लिहायचे की 'लॅक'?

## तुम्हालाही माहिती नाही? जाणून घ्या 'आरबीआय'चे नियम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



गेल्या काही वर्षांपासून देशातील नागरिकांमध्ये डिजिटल ट्रांझेक्शन मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तरीही काही कामांसाठी अजूनही चेकचा वापर केला जातो. ज्यामुळे यासंबंधित महत्त्वाच्या गोष्टी माहिती असणे खूप गरजेचे असते.

कॅश काढायची असो किंवा मग जमा करायची असोत. कोणतेही पेमेंट करण्यासाठी बँक ही अत्यंत महत्त्वाची असते. कोणत्याही डिजिटल ट्रांझेक्शनच्या माध्यमातून पैसे देऊ शकतात. पण तुम्ही एखाद्या कारणामुळे हे काम करू शकले नाही तर चेकच्या माध्यमातूनही पेमेंट केली जाऊ शकते. चेक पेमेंट करण्याची सर्वांत सोपी आणि सुरक्षित पद्धत आहे. चेक जारी करताना तुम्ही अमाउंट शब्दांमध्ये लिहिणे गरजेचे असते.

चेक जारी करताना किंवा कोणताही चेक घेताना तुम्ही नोटीस केले असेल, की रक्कम लिहिताना 'लाख' लिहावे की 'लॅक' लिहिले जाते. पण यापैकी योग्य शब्द कोणता? लॅक लिहिल्याने चेक हा रद्द होऊ शकतो का? आज आपण याविषयी सविस्तर जाणून घेऊया.

'लाख' भारतीय काउंटिंग सिस्टममध्ये एक लाख रुपये दर्शवतो. हा शब्द हिंदी आणि भारतीय संस्कृतीमध्ये सामान्य आहे. तसेच 'लॅक' विषयी बोलायचे झाल्यास या शब्दाचा इंग्री डिक्शनरीमध्ये वेगळा अर्थ आहे. हा कीटकांद्वारे तयार केला जाणारा राळेसारखा पदार्थ आहे. याचा वापर वार्निश, पॉलिश किंवा सीलिंग व्हॅक्स तयार करण्यास होतो. पण देशातील बँकिंग सिस्टममध्ये 'लॅक'चा वापर लोक एक लाख रुपये लिहिण्यासाठी करतात.

'आरबीआय'ने सामान्य लोकांसाठी 'लाख' किंवा 'लॅक' च्या वापरावर कोणताही कठोर नियम तयार केलेला नाही. पण 'आरबीआय'च्या मास्टर सर्कुलरमध्ये 'लाख' ला एक लाख रुपयांसाठी योग्य शब्द सांगितले गेले आहे. आरबीआयची मुद्रा, वेबसाइट आणि वेगवेगळ्या डॉक्यूमेंटवरही 'लाख'चा वापर केला जातो. म्हणजेच ऑफिशियली 'लाख' लिहिणे योग्य ठरते.

चांगली गोष्ट म्हणजे तुम्ही चेक जारी करताना 'लॅक' लिहिले तर यामुळे तुमच्याकडून जारी चेक रद्द किंवा डिसऑनर होणार नाही. देशात दोन्हीही शब्द कॉमन आहेत. 'आरबीआय'ने सामान्य लोकांसाठी कोणत्याही प्रकारचा कठोर नियम बनविलेला नाही. बँक 'लाख' किंवा 'लॅक' दोन्ही लिहिलेले चेक स्वीकारते. तरीही युनिफॉर्मिटी आणि ऑफिशियली स्टँडर्डसाठी 'लाख' लिहिणे बेस्ट ठरते.

यामुळे चेकवर रक्कम लिहिताना तुम्ही 'लाख'चा वापर करा. हा 'आरबीआय'चा आवडीचा शब्द आहे आणि फायनेंशियल डॉक्युमेंटमध्ये स्पष्टता आणते. खरेतर 'लॅक'ने चेक कँसल होत नाही. पण योग्य सवय फॉलो करणे चांगले. यामुळे भविष्यात कोणत्याची प्रकारची अडचण येत नाही.

# पावसाळी आजारांना दूर ठवतो हा एक आयुर्वेदिक पदार्थ!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयुर्वेदातील अत्यंत गुणकारी औषध म्हणजे ज्येष्ठमध. याचे अनेकविध फायदे आरोग्यासाठी मानले गेले आहेत. ज्येष्ठमध ही आयुर्वेदातील एक अत्यंत चमत्कारिक आणि गुणकारी औषधी वनस्पती असून ती पावसाळ्यात आरोग्याचे रक्षण करते.

### सर्दी-खोकल्यावर रामबाण उपाय

पावसाळ्यातील बदलत्या हवामानामुळे होणारी सर्दी, खोकला आणि घशातील खवखव दूर करण्यासाठी ज्येष्ठमध हा शतकानुशतके प्रभावी उपाय आहे.

### मजबूत रोगप्रतिकारक शक्ती

ज्येष्ठमधातील मुबलक अँटी ऑक्सिडंट्स शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमालीची मजबूत करतात. ज्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका टळतो.



### पचनक्रिया सुधारण्यास मदत

पावसाळ्यात बहुतांश लोकांना अपचनाचा त्रास होतो; अशा वेळी ज्येष्ठमधाचे सेवन पोटाचे विकार शांत करून पचनक्रिया गतिमान करते.

### ॲसिडिटीपासून आराम

पावसाळ्यात मसालेदार खाण्यामुळे होणारी ॲसिडिटी घालवण्यासाठी ज्येष्ठमधाचे चूर्ण कोमट पाण्यासोबत घेतल्यास पोटातील आम्ल संतुलित राहते.

### फुफ्फुसांचे आरोग्य राहते उत्तम

हे आयुर्वेदिक औषध त्वरित फुफ्फुसांमधील कफ साफ करून त्यांचे आरोग्य उत्तम ठेवते आणि श्वास घेण्यास होणारा त्रास कमी करते.

### त्वचेचे इन्फेक्शन होते दूर

पावसाळ्यातील दमट वातावरणामुळे त्वचेवर येणारे डाग, खाज आणि वेगवेगळ्या प्रकारचे इन्फेक्शन्स दूर करण्यासाठी ज्येष्ठमध फायदेशीर ठरतो.

### हाय ब्लड प्रेशर असलेल्यांना इशारा

ज्येष्ठमध आरोग्यासाठी वरदान असला तरी, हाय ब्लड प्रेशर (उच्च रक्तदाब) असलेल्या रुग्णांनी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय याचे सेवन करू नये.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे





## श्री शनी अष्टकम्

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

नमः कृष्णाय नीलाय शितिकण्ठ निभाय च।
नमः कालाग्निरूपाय कृतान्ताय च वै नमः।
नमो निर्मांस देहाय दीर्घश्मश्रुजटाय च।
नमो विशालनेत्राय शुष्कोदर भयाकृते।
नमः पुष्कलगात्राय स्थूलरोम्णेऽथ वै नमः।
नमो दीर्घाय शुष्काय कालदंष्ट्र नमोऽस्तु ते।
नमस्ते कोटराक्षाय दुर्नरीक्ष्याय वै नमः।
नमो घोराय रौद्राय भीषणाय कपालिने।
नमस्ते सर्वभक्षाय बलीमुख नमोऽस्तु ते।
सूर्यपुत्र नमस्तेऽस्तु भास्करेऽभयदाय च।
अधोदृष्टेः नमस्तेऽस्तु संवर्तक नमोऽस्तु ते।
नमो मन्दगते तुभ्यं निस्त्रिंशाय नमोऽस्तुते।
तपसा दग्ध-देहाय नित्यं योगरताय च।
नमो नित्यं क्षुधार्ताय अतृप्ताय च वै नमः।
ज्ञानचक्षुर्नमस्तेऽस्तु कश्यपात्मज-सूनवे।
तुष्टो ददासि वै राज्यं रुष्टो हरसि तत्क्षणात।
देवासुरमनुष्याश्च सिद्ध-विद्याधरोरगाः।
त्वया विलोकिताः सर्वे नाशं यान्ति समूलतः।
प्रसाद कुरु मे सौरे ! वारदो भव भास्करे।
एवं स्तुतस्तदा सौरिर्ग्रहराजो महाबलः।

# भारत में शनिदेव के चमत्कारी मंदिर कौन से हैं?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

शनिदेव सिर्फ ग्रह नहीं अपितु भगवान स्वरूप माने गए हैं। शनिदसव न्याय के देवता है वे हमारे सूक्ष्म से सूक्ष्म कर्म का भी हिसाब रखते हैं और यथोचित दंड और पुरस्कार दोनों देते हैं। अगर कर्म अच्छे हैं तो शनिदेव से कतई डरने की ज रूरत नहीं है। आइए जानते हैं शनि देव के भारत में स्थित चमत्कारी मंदिर.

### शनि शिंगणापुर

महाराष्ट्र के अहमदनगर जिले में स्थित है शिंगणापुर गांव इसे शनि शिंगणापुर के नाम से भी जाना जाता है। इस गांव में शनि देव का चमत्कारी मंदिर स्थित है। इस गांव में किसी भी घर या दुकान में दरवाजा नहीं है। यहां शनि देव की कोई मूर्ति नहीं बल्कि एक बड़ा सा काला पत्थर है, जिसे शनि का विग्रह रूप माना जाता है। गांव में शनि देव की कृपा हमेशा बनी रहती है और यहां कभी चोरी नहीं होती।

### उज्जैन का शनि मंदिर

मध्य प्रदेश की धार्मिक राजधानी उज्जैन मानी जाती है। यहां भगवान महाकाल का मंदिर है जो पूरे विश्व में प्रसिद्ध है। भगवान शिव जी के मंदिर के साथ-साथ यहां प्राचीन शनि मंदिर भी है। यहां स्थित शनि मंदिर की विशेषता ये है कि यहां शनि देव के साथ-साथ अन्य नवग्रहों की मूर्तियां भी हैं, जिसकी वजह से इसे नवग्रह मंदिर भी कहा जाता है। उज्जैन के इस मंदिर में दूर-दूर से शनि भक्त दर्शन करने आते हैं।

### महादेव के साथ विराजमान शनि देव

तिरुनल्लर शनि मंदिर तमिलनाडु के प्रमुख मंदिरों में गिना जाता है। मान्यता है कि जिन लोगों पर शनि की कृपा नहीं होती है वो लोग यहां दर्शन के लिए आते हैं। शनि मंदिर, तिरुनल्लर शनि देव को समर्पित तमिलनाडु के नवग्रह मंदिरों में से एक है। भारत में स्थित शनि देव के मंदिरों में यह सबसे पवित्र भी माना जाता है। माना जाता है कि इस मंदिर में भगवान शिव की पूजा करने से शनि ग्रह के सभी बुरे प्रभावों से मुक्ति मिल जाती है।



### भगवान श्रीकृष्ण ने यहां किए शनि देव के दर्शन

उत्तर प्रदेश में ब्रज मंडल के कोसीकलां गांव के पास भी एक शनि मंदिर स्थित है। मान्यताओं के अनुसार इस मंदिर में भगवान श्रीकृष्ण ने शनिदेव को दर्शन दिए थे। जिसका वर्णन गीता में मिलता है। इस जगह को लेकर यह भी कहा जाता है की जो भक्त यहां की परिक्रमा करता है, उसे भगवान शनि कभी कष्ट नहीं पहुंचाते।

### स्त्री रुप में विराजमान हैं शनिदेव


गुजरात में भावनगर के सारंगपुर में भगवान हनुमान का एक प्राचीन मंदिर स्थित है। इस मंदिर को कष्टभंजन हनुमानजी के नाम से भी जाना जाता है। इस मंदिर की सबसे खास बात ये है कि यहां भगवान हनुमान के साथ शनि देव भी विराजित हैं। यहां पर शनि देव स्त्री रूप में हनुमान के चरणों में बैठे दिखाई देते हैं। इस मंदिर को लेकर कहा जाता है कि यदि किसी भी भक्त की कुंडली में शनि दोष हो तो कष्टभंजन हनुमान के दर्शन करने से सभी दोष खत्म हो जाते हैं।

### इंदौर के शनिदेव

इंदौर (अहिल्या नगरी) में शनिदेव का प्राचीन व चमत्कारिक मंदिर जूनी इंदौर में स्थित है। इस मंदिर के संबंध में कथा प्रचलित है- मंदिर के स्थान पर लगभग 300 वर्ष पूर्व एक 20 फुट ऊंचा टीला था, जहां वर्तमान पुजारी के पूर्वज पंडित गोपालदास तिवारी आकर ठहरे। एक रात शनिदेव ने पंडित गोपालदास को स्वप्न में दर्शन देकर कहा कि उनकी एक प्रतिमा उस टीले के अंदर दबी हुई है। शनिदेव ने पंडित को टीला खोदकर प्रतिमा बाहर निकालने का आदेश दिया। जब पंडित कहा कि वे दृष्टिहीन होने से इस कार्य में असमर्थ हैं, तो शनिदेव उनसे बोले- 'अपनी आंखें खोलो, अब तुम सब कुछ देख सकोगे।'

आंखें खोलने पर पंडित गोपालदास ने पाया कि उनका अंधत्व दूर हो गया है और वे सबकुछ साफ-साफ देख सकते हैं। दृष्टि पाने के बाद पंडितजी ने टीले को खोदना शुरू किया। उनकी आंखें ठीक होने की वजह से अन्य लोगों को भी उनके स्वप्न की बात पर यकीन हो गया तथा वे खुदाई में उनकी मदद करने लगे। पूरा टीला खोदने पर पंडितजी का स्वप्न सच साबित हुआ तथा उसमें से शनिदेव की एक प्रतिमा निकली। बाहर निकालकर उसकी स्थापना की गई। यही प्रतिमा आज इस मंदिर में स्थापित है।

# साडेसाती आणि शनीच्या ढैय्याने त्रास असल्यास शनिवारी करा हा उपाय; शनिदेव करतील कृपा



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सध्या ज्योतिषाच्या गणनेनुसार धनू, मकर आणि कुंभ या राशींत शनी ग्रहाची साडेसाती सुरू आहे. कुंडलीत शनी अशुभ असतो तेव्हा साडेसातीच्या वेळी त्रास देतो. सतीच्या काळात व्यक्तीला नोकरी, व्यवसाय, शिक्षण आणि करिअरशी संबंधित समस्यांना सामोरे जावे लागते. यासोबतच आरोग्य आणि वैवाहिक जीवनाशी संबंधित समस्यांना सामोरे जावे लागते.

### शनीचा ढैय्या काय आहे?

मिथुन आणि तूळ या राशींवर शनीची धुरा चालू आहे. शनीची ढैय्या शुभ मानली जात नाही. या दरम्यान व्यक्तीला कामात अडथळे येतात.

### शनीसाठी उपाय

शनिदेवांना प्रसन्न करण्यासाठी शनिवार हा सर्वोत्तम दिवस मानला जातो. ज्या लोकांवर शनी जड असतो, शनीची दृष्टी असते किंवा साडेसाती सती आणि ढैय्या इत्यादींनी त्रासलेले असतात या दिवशी सूर्यास्तानंतर निर्जन ठिकाणी किंवा मंदिरात असलेल्या अशा पिंपळाजवळ दिवा लावावा. असे केल्याने शनिदेव प्रसन्न होतात. यासोबत तुम्ही हे उपाय देखील करू शकता-

- शनिवारी शनिदेवाला मोहरीचे तेल अर्पण करा.
- पिंपळाला पाणी द्यावे.
- हनुमानजींना चोळ अर्पण करा.
- शनिवारी गहू, मका, ज्वारी, तांदूळ, हरभरा, काळे उडीद दान करा.
- गरिबांना काळे ब्लँकेट दान करा.
- तुम्ही शूज देखील दान करू शकता.
- कुष्ठरुग्णांची सेवा करा.

### शनिवारी या गोष्टी लक्षात ठेवा

- जे कष्ट करतात त्यांचा अपमान करू नका.
- क्रोध आणि अहंकारापासून दूर राहा.
- निंदा ऐकू नका.
- नियम मोडू नका.
- मोहात पडू नका.
- कोणाचीही फसवणूक करू नका.

# शनिची महादशा शुभ की अशुभ?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

शनिची महादशा म्हणजे केवळ अडचणींचा काळ वाटतो, पण प्रत्यक्षात हा काळ व्यक्तीला घडवणारा, शिकवणारा आणि योग्य मार्गावर आणणारा असतो. त्यामुळे शनिची महादशा प्रत्येकासाठी अशुभच असते असे नाही. शनिची महादशा शुभ असते की अशुभ आणि त्याचा व्यक्तीच्या जीवनावर काय परिणाम होतो ते जाणून घेऊया.

### शनिची महादशा म्हणजे काय?

वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार प्रत्येक ग्रहाची एक महादशा असते. पण त्यात शनिची महादशा सर्वांत प्रभावी आणि दीर्घ मानली जाते. शनिची महादशा साधारण १९ वर्षे चालते. या काळात शनि ग्रहाचा प्रभाव जीवनावरती जास्त असतो. मुळात शनि ग्रह हा कर्म, शिस्त आणि न्याय यांचा कारक ग्रह मानला जातो.

### शनिची महादशा शुभ असते की अशुभ?

शनिची महादशा तुमचा जसा कर्म तसे फळ देते. तुमच्या चांगल्या वाईट कृतीचे फळ या महादशेत मिळते. जर तुमचे कर्म चांगले असतील तर शनि तुमच्यासाठी अनेक शुभ संधी घेऊन येतो. जसे करिअरमध्ये प्रगती, स्थैर्य, पैसा, जबाबदारी वाढणे आणि प्रगतीचे फळ मिळणे. जर शनि अशुभ असेल तर अनेक आव्हानांचा सामना देखील करावा लागतो. जसे की, अडचणी, विलंब, आर्थिक काळ, मानसिक तणाव आणि नात्यांमध्ये तणाव जाणवू लागतात.

### शनिच्या महादशेत कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात?

महादशा ही शिकवणारी असते. यामध्ये तुम्ही संयम, कष्ट आणि शिस्त शिकता तरी अनेक जण लोकश्रद्धेनुसार, शनिच्या महादशेचा त्रास होऊ नये म्हणून शनिवारी शनिची पूजा करतात, दान करतात, तेलाचा दिवा लावतात. **शनिच्या महादशेवेळी कोणती काळजी घ्यावी?**

घाईघाईत निर्णय घेऊ नयेत. प्रामाणिकपणा आणि मेहनत टिकवावी. शिस्तबद्ध जीवनशैली ठेवावी. नकारात्मक विचार टाळावेत. शनिची महादशा असल्यास हे उपाय करावेत. शनिवारी काळे तीळ, तेल या गोष्टींचे दान करावे. हनुमानजींची पूजा करावी. गरीब आणि गरजू लोकांना मदत करावी. ध्यान आणि साधना करावी.

# नीम करोली बाबांचे हे ३ उपाय मनात येणाऱ्या विचारांच्या वादळांना शांत करू शकतात?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

बाबा नीम करोली यांनाही हनुमानजींच्या कृपेने अनेक प्रकारच्या सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. बाबा नीम करोली यांनी त्यांच्या आयुष्यात अशा अनेक गोष्टी सांगितल्या आहेत, ज्या माणसाच्या मनातील वादळ शांत करू शकतात. त्या उपायांबद्दल जाणून घेऊया.


### नीम करोली बाबा यांचे उपाय

नीम करोली बाबा हे केवळ संत नाहीत तर श्रद्धेचे प्रतीक आहेत. २० व्या शतकात त्यांनी आपल्या ज्ञानाने आणि विचारांनी लोकांमध्ये सकारात्मक ऊर्जा पसरवली. नीम करोली बाबा हे हनुमानजींचे एक महान भक्त मानले जात होते. असे म्हटले जाते की बाबा नीम करोली यांना हनुमानजींच्या कृपेने अनेक प्रकारच्या शक्ती प्राप्त झाल्या होत्या. यामुळेच त्यांनी त्याचा योग्य वापर करून लोकांना फायदा करून दिला. बाबा नीम करोली यांनी त्यांच्या आयुष्यात अशा अनेक गोष्टी सांगितल्या आहेत, ज्या माणसाच्या मनातील वादळ शांत करू शकतात. त्या उपायांबद्दल जाणून घेऊया.

- नीम करोली बाबा यांच्या मते या जगात जे काही घडते किंवा घडत आहे ते देवाच्या योजनेनुसार आणि त्याच्या इच्छेनुसार घडते. म्हणून कधीही काळजी करू नये तर सर्व काही देवावर सोपवू नये. माणसाने नेहमी देवावर विश्वास आणि श्रद्धा ठेवली पाहिजे.

- नीम करोली बाबा म्हणायचे, की आयुष्यात सुख आणि दुःख वेळोवेळी येत राहतात आणि जात राहतात. परंतु या सर्वांमुळे, एखाद्या व्यक्तीने अनावश्यक काळजी करून स्वतःचे नुकसान करू नये. बाबा नीम करोली यांच्या मते, माणसाने जीवनात येणाऱ्या सुख-दुःखांना देवाचा प्रसाद म्हणून स्वीकारले पाहिजे.

- नीम करोली बाबा असा विश्वास ठेवत होते, की मनातील सर्व गोंधळ आणि त्रास देवाच्या चरणी ठेवावेत. असे केल्याने त्या व्यक्तीचे मन हलके वाटू लागते आणि त्याला पुन्हा आपले काम करण्यासाठी सकारात्मक ऊर्जा मिळते. बाबा म्हणायचे की माणसाने आपले काम संयमाने करत राहिले पाहिजे.



# नीम करोली बाबांचा 'हा' महान मंत्र तुमचे नशीब बदलेल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

नीम करोली बाबा हे २० व्या शतकातील एक महान संत आणि आध्यात्मिक गुरू म्हणून ओळखले जातात. आज ते भौतिक स्वरूपात नसले तरी त्यांचे विचार आजही प्रासंगिक आहेत. नीम करोली बाबा हे हनुमानजींचे एक महान भक्त मानले जात होते. त्यांचे अनुयायी म्हणतात की बाबा नीम करोली हे अनेक सिद्धींचे स्वामी होते, ज्याचा पुरावा त्यांनी दाखवलेल्या चमत्कारांमध्ये आढळतो. आज त्याचे लाखो भक्त आहेत.

नीम करोली बाबा यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य प्रेमाने आणि साधेपणाने जगले. देवावरील त्याच्या खोल आणि अढळ श्रद्धेमुळे तो केवळ लोकांचा प्रिय नव्हता तर त्याला देव म्हणूनही पूजले जात असे.

नीम करोली बाबांचे भगवान हनुमानावर इतके प्रेम होते की लोक त्यांना भगवान हनुमानाचा अवतार म्हणू लागले. आजही लोक बाबांच्या दिव्य उपस्थितीचा अनुभव घेण्यासाठी उत्तराखंडमधील त्यांच्या कैंची धाम आश्रमात येतात. येथे हनुमानजींचे एक दिव्य मंदिर देखील आहे.

बाबा नीम करोली यांनी त्यांच्या हयातीत अनेक हनुमान मंदिरे बांधली. हनुमानाच्या भक्तीत नेहमीच मग्न असलेले नीम करोली बाबा आपल्या ज्ञानाने जगाला जागृत करण्याचे काम करत होते. अनेक शिकवणी देण्यासोबतच त्यांनी एक महान मंत्र देखील दिला, जो कोणत्याही व्यक्तीचे दुःख एका क्षणात संपवू शकतो. तुम्हाला माहिती आहे का?

**नीम करोली बाबांचा मंत्र**

**मैं हूं बुद्धि मलीन अति,**
**श्रद्धा भक्ति विहीन।**
**करु विनय कछु आपकी,**
**होउ सब ही विधि दीन।।**
**श्रद्धा के यह पुष्प कछु,**
**चरणन धरि सम्हार।**
**कृपासिंधु गुरुदेव प्रभु,**
**करि लीजे स्वीकार।।**

# शिंगणापूरमध्ये खडकरूपात शनिदेव कसे प्रकट झाले?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

नवग्रहांमध्ये शनिदेव हे सर्वांत धोकादायक मानले जातात, हे आपणा सर्वांना माहीत आहेच. शनिदेवांची वक्रदृष्टी ज्याच्यावर पडेल त्याचा सर्वनाश निश्चित आहे, मग तो कितीही बलवान असो वा श्रीमंत. भगवान शनिदेव हे त्यांचे वडील सूर्यदेव यांच्यासारखे तेजस्वी आणि त्यांचे गुरुदेव भगवान शिव यांच्यासारखे गंभीर आहेत. कर्मफल दाता म्हणून ओळखले जाणारे शनिदेव महाराज माणसाला त्याच्या कर्मानुसार फळ देतात आणि ते खालच्या स्तरातील लोकांचे परम शुभचिंतक आहेत. शनिदेव शिंगणापूरच्या सर्वांत प्रसिद्ध मंदिराविषयी जाणून घेऊया.



### एक दिव्य शिळा शिंगणापूरला आली

शनि शिंगणापूर हे महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातील एक गाव आहे, जे शनिदेवांच्या मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. पौराणिक कथेनुसार श्रावण महिन्यात एके दिवशी मुसळधार पावसामुळे पाण्याची पातळी खूप वाढली होती, त्यातच शिंगणापूरच्या काठावर एक मोठा काळा खडक आला होता. काही वेळाने गावातील काही मुले तिथे खेळायला आली, मुले माती आणि दगडांनी खेळू लागली आणि एका लहान मुलाने चुकून त्या काळ्या दगडावर एक मोठा दगड आपटला.

### प्रत्येकाला शिळ्यात प्रेम आत्मा दिसली

दगड आदळताच दगडातून जोरात किंचाळण्याचा आवाज आला आणि त्याचवेळी त्यातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या, हे भयानक दृश्य पाहून सर्व मुले घाबरून घराकडे पळाली. तेथे गेल्यानंतर घाबरलेल्या मुलांनी हा सगळा प्रकार आपल्या कुटुंबियांना सांगितला, त्यानंतर संपूर्ण गाव त्या खडकाला पाहण्यासाठी नदीच्या काठावर जमा होऊ लागला. तो विचित्र खडक पाहून गावकऱ्यांना आश्चर्य वाटले आणि काहीजण त्या खडकाला भूत म्हणू लागले, काही वेळाने ते सर्वजण गावात परतले.

### शनिदेवानेच वास्तवाची ओळख करून दिली.

त्या रात्री शनिदेव महाराजांना स्वप्नात दर्शन झाले आणि त्यांनी गावच्या प्रमुखाला सांगितले, की ते स्वतः खडकाच्या रूपात आपल्या गावात आले आहेत. हे ऐकून मुख्याध्यापकाला खूप आनंद झाला आणि दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने संपूर्ण स्वप्न गावकऱ्यांना सांगितल्यानंतर तो फार विलंब न लावता बैलगाडी वगैरे घेऊन नदीकाठी पोहोचले. तेथे गेल्यावर शनिदेव इत्यादींची स्तुती करून पूर्ण आदराने त्यांना बैलगाडीत बसवून गावात आणून प्रतिष्ठापना करण्यात आली.

# शनिवारी काय खाऊ नये?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

शनिवारी शनिदेवाची पूजा केली जाते. या दिवशी शनिदेवाला मोहरीचे तेल अर्पित केल्याने त्यांची कृपादृष्टी राहते असे म्हणतात. तरी या व्यतिरिक्त शनिवारी काही उपाय केले पाहिजेत ज्यांनी शनिदेवाचा कोप होत नाही. या दिवशी काही पदार्थांचे सेवन आवर्जून टाळले पाहिजे.

- शनिवार कैरीचे लोणचे खाऊ नये. हे आबंट असल्यामुळे खाणे टाळावे. खरेतर शनिवारी कोणतेही आंबट पदार्थ खाणे टाळावे.

- शनिवारी लाल तिखट खाणे टाळावे कारण याला मंगळ आणि सूर्य ग्रहाचे प्रतीक मानले गेले आहे. दोन्ही शनी विरोधी आहे. अशात या दिवशी लाल तिखट खाल्ल्याने शनीचा प्रकोप झेलावा लागू शकतो.

- शनिवारी चणा, उडीद, मूग आणि मसूर डाळ खाणे देखील टाळावे. कारण हे सर्व मंगळ ग्रहाचा प्रभाव दर्शवतात. याचे सेवन केल्याने सुरळीत होणारे कामांमध्ये देखील अडथळे निर्माण होऊ शकतात.



- शनिवारी मद्य सेवन करू नये. मद्य राक्षसांचे पेय मानले गेले आहे. मद्यपान केल्याने बुद्धी भ्रष्ट आणि भ्रमीत होते. याने शनिदेव नाराज होतात. मद्यपान केल्याने मान-सन्मान मिळत नाही आणि जीवाचा धोका देखील वाढतो.

- शनिवारी दूध किंवा दह्याचे सेवन करू नये. हे चंद्राचे प्रतीक आहे. याचे सेवन केल्याने शनिदेव नाराज होऊ शकतात. याने मानसिक त्रास झेलावा लागू शकतो. तरी दही सेवन करायचे असेल तर त्यात धणेपूड, पुदिना, गूळ किंवा केशर मिसळून सेवन करावे.

- शनिवारी मांसाहार करू नये. याने शनिदेवाचा क्रोध वाढू शकतो. याने व्यक्ती वाईट संगतीत अडकू शकतो. यासोबतच धनाचा नाशही होऊ शकतो.

- शनिवारी पिवळ्या रंगाचे पदार्थ खाऊ नये. कारण हे बृहस्पती देवांचे अन्न मानले जाते आणि शनी आणि गुरूमध्ये सुसंगत नसल्याने माणसाच्या आयुष्यात अडचणी येऊ शकतात.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)